Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

बीड व यवतमाळ जिल्हयामध्ये शेळीपालन एक

उच्चमुल्य वर्धित व्यवसाय गटाचे प्रात्यक्षिके आयोजित करणे

प्रस्तावना

या उपघटकामध्ये बीड आणि यवतमाळ जिल्हयातील शेळीपालक अग्रणी शेतकरी , ज्यांच्याकडे बागायती जमीन असून ज्यांची चारा पीके घेण्याची मानसिकता आहे. अशा शेतक-यांची निवड सेवा दाते व पशुसंवर्धन खाते यांचेद्वारे ग्रामसभेच्या मंजुरीने करण्यात यावी.

ज्याप्रमाणे शेतीमध्ये नगदी पीक ाचे उत्पादन घेतल्याने शेतमालाचे उत्पादन वाढून शेती व्यवसायचे मुल्यवर्धन होते, तद्वतच एक हेक्टर बागायती शेतीमध्ये संकरीत नेपीयर गवत व लसूण घासाची लागवड केल्यास प्रतीवर्षी १०० मे. टन. हिरव्या चा-यांचे उत्पादन मिळते. हा चारा १०० शेळयांना वर्षभर उपलब्ध होतो. या चा-यावर जोपासलेल्या १०० शेळयापासून जन्मणा-या शेळ्यांची विक्री केल्यास प्रतिवर्षी त्याची किंमत रू. २,००,०००/- इतकी मिळू शकते. ही मिळालेली किंमत नगदी पिकाच्या किंमती इतकी असल्यामुळे शेळीपालन हा एक उच्चमुल्यवर्धीत व्यवसाय असल्याचे दिसून येते.

ही वस्तुस्थिती विचारात घेता, या उपघटकाच्या अंमलबजावणीद्वारे शेळीपालन एक उच्चमुल्य वर्धित व्यवसाय ही संकल्पना बीड व यवतमाळ या दोन जिल्ह्यांत राबविण्यात येणार आहे. या उपघटकांतर्गत लाभार्थीना संकरीत नेपीयर, लसूण घास बियाणे व त्यांसाठी लागणारे रासायनीक खत १०० टक्के अनुदानावर देण्यात यावी, तसेच शेतक-यांना पैदाशीसाठी बोकड व हिरवा / वाळलेला चारा कुट्टी करण्यासाठी हस्तचलित चारा कटाईयंत्र (प्रकल्प हिस्सा रु.२०००/- प्रत्येकी याप्रमाणे रु.४०००/- प्रति प्रात्यक्षिक धारकांना) पुरवठा करण्यात यावा.

कार्यक्षेत्र व कालावधी

सदर उपघटकाची अंमलबजावणी विदर्भ व मराठवाडयातील जिल्हयातून करावयाची असून उपघटक अंमलबजावणीचा कालावधी सन २०११-१२ ते २०१२-१३ यवतमाळ जिल्हयासाठी व २०१२-१३ ते २०१३-१४ बीड जिल्हयासाठी राहील.

उपघटकाचे स्वरुप

या उपघटकांची अंमलबजावणी सेवादाते, पशुसंवर्धन खाते व आत्मा यांच्यामार्फत करण्यात यावी.

- जिल्हयातीलशेळीपालक अग्रणी शेतकरी , ज्यांच्याकडे बागायती जमीन असून ज्यांची चारा पीके घेण्याची मानसिकता आहे, अशा २५० शेतक-यांची निवड ग्रामसभेच्या मंजुरीने करावी - सेवादातेमार्फत
- निवड केलेल्या २५० शेतक-यांना प्रशिक्षण देणे व या संकल्पनेची संपूर्ण माहीती तसेच व शेळीपालन व्यवस्थापन, हिरव्या चारा निर्मितीचे व्यवस्थापन, बाजार व्यवस्थापन या विषयीची माहिती प्रशिक्षण देण्यात यावी. - सेवादातेमार्फत
- निवड केलेल्या २५० शेतक-यांना तीन दिवसाचे प्रशिक्षण देण्यात यावे - सेवादाते, खाते व आत्मा यांच्यामार्फत
- निवड केलेल्या २५० शेतक-यांना १०० टक्के अनुदानावर १००० रु मर्यादेपर्यत हिरव्या चा-याचे बियाणे पुरवठा करावा- खात्यामार्फत
- निवड केलेल्या २५० शेतक-यांना रु.२०००/- प्रकल्प हिस्सा याप्रमाणे एक पैदासक्षम मेढे नर/ बोकड पुरवठा करावा - खात्यामार्फत
- निवड केलेल्या २५० शेतक-यांना रु.२०००/- प्रकल्प हिस्सा याप्रमाणे हस्तचलित चारा कटाई यंत्र पुरवठा करावा- खात्यामार्फत
- निवड केलेल्या २५० शेतक-यांची जोडणी शेळी मेंढी बाजाराशी करावी - सेवादातेमार्फत
- जिल्हा अंतर्गत ५०० शेतक-यांच्या भेटी व तांत्रिक प्रात्यक्षिकांचे आयोजन करावे - सेवादातेमार्फत
- नजीकच्या जिल्हयातील ५०० शेतक-यांच्या भेटी व तांत्रिक प्रात्यक्षिकांचे आयोजन कराव्यात - सेवादातेमार्फत

शेतक-यांची निवड

ज्या शेतक-यांकडे किमान २० शेळया आहेत व त्यांचे पालन ठाणबंद पध्दतीने केलेले आहे तसेच ज्या लाभार्थीकडे बागायती जमीन आहे आणि त्यावर चा-याची पीके घेण्यास त्यांची तयारी आहे , अशा शेतक-यांची निवड सेवादाते आणि

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

पशुसंवर्धन खाते संयुक्तरित्या ग्रामसभेच्या संमतीने करावी व त्या नुसार केलेल्या निवडीस जिल्हा स्तरीय समितीने अंतीम मंजूरी देऊन निवडप्रक्रिया पूर्ण करावी.

निकष

शेतक-यांकडे किमान २० शेळ्या असून त्यांचे पालन ठाणबंध पध्दतीने केलेले असणे गरजेचे आहे. त्यांचेकडे बागायती जमीन ०.५ ते २.०० हेक्टर जमीन असणे गरजेचे आहे. त्यावर चारा पीके घेण्याची तयारी असणे गरजेचे आहे. त्यांचे क्षेत्रावर इतर शेतक-यांनी भेटी देण्यासाठी सदर शेतकऱ्यांनी परवानगी देणे आवश्यक राहील.

अंदाजपत्रक

- सेवादात्यामार्फत २५० शेतक-यांना एक पैदासक्षम बोकड पुरवठा करण्यासाठी निवड करावी.
- निवड केलेल्या शेतक-यांना १०० टक्के अनुदानावर हिरवा चारा बियाणे व खते पुरवठा करण्यासाठीचा प्रस्ताव पशुधन विकास अधिकारी विस्तार पंचायत समिती यांनी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांच्यामार्फत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचेकडे सादर करावा.
- जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी २५० शेतक-यांना १०० टक्के अनुदानावर (प्रति शेतकरी रु.१००० मर्यादेपर्यत) हिरव्या वैरणीचे बियाणे व खते जागतिक बॅकेच्या विहित संपादन पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करतील व प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांची तांत्रिक मान्यता घेऊन शेतक-यांना पुरवठा करावा.
- निवडलेल्या शेतक-यांना रु.२०००/- च्या मर्यादेत प्रकल्प हिस्सा पैदासक्षम बोकड खरेदीसाठी देय राहील. (यामध्ये सदर बोकडाचा तीन वर्ष कालावधीसाठी विमा व बोकडास प्रति दिन ३०० ग्रॅम पशुखाद्य याप्रमाणे किमान दोन महिन्याच्या कालावधीपुरते पशुखाद्य पुरवठयासाठी रु.५००/- व बोकड खरेदीचे अनुदान रु.१५००/- असा एकूण रु.२०००/-च्या मर्यादेपर्यत)
- पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती विस्तार हे लाभार्थीचा पैदासक्षम बोकड खरेदीचा स्वहिस्सा (रु.३५००/-) धनाकर्षाव्दारे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचेकडे जमा करावा.
- जिल्हा पशुसंवर्धन आयुक्त पशुधन विकास अधिकारी यांना स्थानिक खरेदी समिती (सामुदायिक संपादन पध्दती) जागतिक बँकेच्या विहित संपादन पध्दतीअंतर्गत स्थापन करण्याचे व पैदासक्षम बोकड खरेदीचे आदेश देण्यात यावा.
- स्थानिक खरेदी समितीमध्ये खालील सदस्यांचा समावेश करावा.

| | | |
|---|---|---|
| सरपंच अथवा ग्रामपंचायतीचे सदस्य | - | अध्यक्ष |
| प्रात्यक्षिक धारक ३ शेतकरी | - | सदस्य |
| सेवादाते प्रतिनिधी | - | सदस्य |
| विमा प्रतिनिधी | - | सदस्य |
| पशुधन विकास अधिकारी (विस्तार) | - | सदस्य सचिव |

या समितीव्दारे पैदासक्षम बोकडाची (उस्मानाबादी) खरेदी स्थानिक बाजारातूनअथवा नजीकच्या जनावरांच्या बाजारातून करण्यात यावी. पैदासक्षम बोकड खरेदी करण्याची जबाबदारी पशुधन विकास अधिकारी यांची राहील. खरेदी समिती सदर खरेदीस हजर राहून प्रात्यक्षिकधारकांच्या पसंतीनुसार पैदासक्षम बोकड (उस्मानाबादी) खरेदी करण्यात यावा. खरेदी केलेल्या पैदासक्षम बोकडाची आरोग्य तपासणी करुन पशुधन विकास अधिकारी यांनी दाखला देण्यात यावा. सदरची खरेदी करत असताना खरेदी करण्यात येणा-या बोकडाचे वय दीड ते दोन वर्षे इतके असावे. सदर वयाचा अंदाज बोकडाच्या तोंडातील दातावरुन ठरविण्यात यावा. तसेच खरेदी करतेवेळी बोकडाचे वजन २० किलोग्रॅम पेक्षा जास्त असावे. वजनाचा अंदाज प्रत्यक्ष वजनाव्दारे अथवा छातीचे मोजमाप टेपव्दारे करण्यात यावे. सदरचे मोजमाप ५९ ते ६३ सेंटीमीटर किमान इतके असावे. तसेच पैदासक्षम मेढे नर /बोकडाची निवड करत असताना ते पैदासक्षम व आरोग्यदायी असतील याची खातरजमा बोकड यांच्या बाहय शारिरीक ठेवण व लक्षणावरुन करावी. विमा प्रतिनिधी यांनी खरेदी केलेल्या बोकडाचे कानावर बिला मारण्यात यावा. खरेदीअंती खरेदी केलल्या बोकडाची पावती खरेदीदार

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

(लाभार्थी ) व विक्रेता यांच्या नावासह घेण्यात यावी. तसेच खरेदी पावतीवर वय व वजन यांचा उल्लेख असावा. सदरची पावती प्रात्यक्षिकधारक ने पशुधन विकास अधिकारी विस्तार यांच्या मार्फत जिल्हा पशुसंवर्ध न उपाआयुक्त यांना सादर करण्यात यावी. तसेच पशुधन विकास अधिकारी विस्तार पंचायत समिती यांनी स्वास्थ दाखला विमा प्रतिनिधी यांचेमार्फत विमा कंपनीस सादर करुन तीन वर्षाच्या विम्याच्या हप्त्याची पावती प्रात्यक्षिकधारकाच्या बोकड खरेदीसह जिल्हा पशुसवंर्धन उपायुक्त यांना सादर करावी.

- जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी सदर बोकडाच्या खरेदीची पावती व विम्याच्या हप्त्याची पावती यानुसार सादील जिल्हा कोषागारात सादर करुन बोकडाच्या विक्रेत्यास व विमा कंपनीस धनाकर्षाव्दारे रक्कम अदा करण्यात यावी.
- जागतिक बॅक प्रकल्पाचा वाटा अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीव्दारे रु.२०००/- प्रति प्रात्यक्षिकधारक इतका प्राप्त होईल. याप्रमाणे २५० प्रात्यक्षिक धारकाचे अनुदान रु ५.०० लाख जिल्हा पशुसंवर्धन आयुक्त यांना प्राप्त होईल.
- जिल्हा पशुसंवर्धन यांना धनाकर्षाव्दारे पशुधन विकास अधिकारी विस्तार पंचायत समिती व प्रात्यक्षिकधारक यांचेमार्फत प्रति प्रात्यक्षिकधारक हिस्सा रु.३५००/- याप्रमाणे २५० प्रात्यक्षिकधारकांची एकूण रक्कम रु.८७५००० /- प्राप्त होईल व प्राप्त प्रात्यक्षिकधारक हिस्साची पावती प्रात्यक्षिकधारक ंना पशुधन विकास अधिकारी विस्तार पंचायत समिती मार्फत देण्यात यावी.
- खरेदी केलेल्या बोकडास प्रति दिन ३०० ग्रॅम पशुखाद्य याप्रमाणे किमान दोन महिन्याच्या कालावधीपुरते पशुखाद्य पुरवठा करण्यात यावा.
- पशुखाद्यांचा पुरवठा करण्यासाठी पशुधन विकास अधिकारी विस्तार हे खरेदी केलेल्या पैदाशीच्या बोकडाच्या संख्येनुसार तालुक्याची एकत्रित मागणी जिल्हा पशुसंवर्धन उपाआयुक्त यांचेकडे नोंदवावी. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त जागतिक बॅकेच्या विहित संपादन पध्दतीचा अवलंब करुन खाद्यांची खरेदी करुन पुरवठा करावा.
- जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालयाने सदर पैदासक्षम बोकड यांच्या खरेदीचे अभिलेखे प्रकल्प कालावधी संपेपर्यंत अथवा पुढील दोन वर्षापर्यत जोपर्यत जागतिक बॅंकेमार्फत मुल्यमापन होईपर्यंत जतन करण्यात यावे.
- पुरवठा करण्यात आलेल्या बोकडाचा पाठपुरावा पशुधन विकास अधिकारी विस्तार पंचायत समिती यांनी तीन महिन्यातून एकदा पाठपुरावा करुन त्यांच्या अदयावत नोंदी कार्यालयात ठेवण्यात यावी. सदर नोंदीचे जतन प्रकल्प कालावधी संपेपर्यंत अथवा पुढील दोन वर्षापर्यत जोपर्यत जागतिक बॅंकेमार्फत मुल्यमापन होईपर्यंत करण्यात यावे.
- सदर उपघटकांतर्गत खरेदी केलेल्या पैदाशीच्या बोकडाची नोंदी व त्यांनी दिलेल्या पैदाशीच्या सेवांची नोंद प्रात्यक्षिकधारक सेवादात्यामार्फत ठेवण्यात याव्यात.
- प्रात्यक्षिकधारक ने पुरवठा करण्यात आलेल्या पैदासक्ष बोकड यांचे जतन खरेदी केल्यापासून तीन वर्ष करणे जरुरी आहे. यांची माहिती देण्यात यावी व प्रात्यक्षिकधारकांकडून हमीपत्र घेण्यात यावे व त्यांचे जतन पशुधन विकास अधिकारी विस्तार पंचायत समिती यांच्या कार्यालयात ठेवण्यात यावे.

  या समितीव्दारे पैदाशीच्या बोकडाची खरेदी करण्यात यावी. पैदासक्षम बोकड खरेदी करण्याची जबाबदारी पशुधन विकास अधिकारी यांची राहील.
- खरेदी केलेल्या बोकडास प्रति दिन ३०० ग्रॅम पशुखाद्य याप्रमाणे तीन महिन्याच्या कालावधीपुरते पशुखाद्य पुरवठा करावा.
- पशुखाद्यांचा पुरवठा करण्यासाठी पशुधन विकास अधिकारी विस्तार हे खरेदी केलेल्या पैदाशीच्या बोकडाच्या संख्येनुसार तालुक्याची एकत्रित मागणी जिल्हा पशुसंवर्धन उपाआयुक्त यांचेकडे नोंदवावी. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त जागतिक बॅकेच्या विहित संपादन पध्दतीचा अवलंब करुन खाद्यांची खरेदी करुन व प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांची तांत्रिक मान्यता घेऊन पुरवठा करावा .
- सदर उपघटकांतर्गत खरेदी केलेल्या पैदाशीच्या बोकडाची नोंद व त्यांनी दिलेल्या पैदाशीच्या सेवांची नोंद लाभधारक सेवादात्यामार्फत ठेवण्यात यावी.
- सदर पैदाशीच्या बोकडासाठी लागणा-या पशु आरोग्य सेवा नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत पुरविण्यात याव्यात.
- निवडलेल्या शेतक-यांना हस्तचलित चारा कटाई यंत्र पुरवठयासाठी रु.२०००/- प्रकल्प हिस्सा देय राहील.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

- पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती विस्तार हे लाभार्थीचा हस्तचलित चारा कटाई यंत्र खरेदीचा स्वहिस्सा धनाकर्षाव्दारे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचेकडे जमा करावा.
- जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी २५० शेतक-यांना प्रकल्प हिस्सा प्रति शेतकरी रु.२००० मर्यादेपर्यत हस्तचलित चारा कटाई यंत्र जागतिक बॅकेच्या विहित संपादन पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करुन व प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांची तांत्रिक मान्यता घेऊन शेतक-यांना पुरवठा करावा.
- या उपघटकांतर्गत प्रति प्रात्यक्षिकधारकासाठीचा प्रकल्प वाटा प्रति प्रात्यक्षिकधारक रु.५००० प्रमाणे एकूण २५० गटांसाठीचा प्रकल्प वाटा निधी अर्थसंकल्पिय वितरीत प्रणाली व्दारे (बीडीएस) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचेकडे प्राप्त होईल.
- २५० प्रात्यक्षिकधारकांना ३ दिवसाचे शेळीपालन व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात यावे. पशुसंवर्धन खाते, सेवादाते व आत्मायांचेमार्फत प्रशिक्षण देण्यात यावे. प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम सेवादाते यांनी तयार करावा. या उपघटकाच्या अंमलबजावणीसाठीचा निधी संबधित जिल्हयाच्या आत्मा यंत्रणेमार्फत धनाकर्षाव्दारे /धनादेशाव्दारे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्याकडे उपलब्ध होणार आहे.
- २५० प्रात्यक्षिकधारकांच्या प्रात्यक्षिकांस १००० शेतक-यांच्या भेटी सेवादाते यांच्यामार्फत आयोजित करण्यात याव्यात. या शेतक-यांच्या मध्ये ५०० शेतकरी जिल्हयातील (प्रति शेतकरी रु.४००/-)असतील व उर्वरित ५०० शेतकरी नजीकच्या जिल्हयातील (प्रति शेतकरी रु.७५०/-)असतील. या भेटीसाठीचा निधी संबधित जिल्हयाच्या आत्मा यंत्रणेकडून धनाकर्षाव्दारे /धनादेशाव्दारे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्याकडे उपलब्ध करुन घ्यावा.

उपघटकाचे संनियत्रंण

या उपघटकाचे तालुका पातळी वर पशुधन विकास अधिकारी विस्तार पंचायत समिती यांनी संनियंत्रण करावे. जिल्हापातळीवर संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचाकडून तर विभागीय पातळीवर प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त आणि राज्य पातळीवर अतिरीक्त आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य पुणे यांनी सदर उपघटकाचे संनियंत्रण करावे.

फलनिष्पती

या उपघटकाच्या अंमलबजावणीमुळे जिल्ह्यामध्ये शेळी पालन एक उच्च मूल्यवर्धीत व्यवसाय ही संकल्पना रूजण्यास व दृढ होण्यास मोठा हातभार लागेल.शेतक-यांची शेळी पालना विषयीची मानसिकता वाढीस लागेल व शेतीसाठी शेळ्यामेंढ्या पासून सेंद्रीय खत मोठ्या प्रमाणात उपलब्ध होऊन जमीनीचा पोत सुधारण्याबरोबरच शेतीच्या उत्पादनावर सकारात्मक परिणाम दिसून येईल. या प्रात्यक्षिक युनिटसना शेतक-यांच्या भेटी प्रस्तावित असल्यामुळे इतर शेतक-यांमुळे या संकल्पनेचा प्रसार होऊन शेळीपालन व्यवसायाद्वारे मांस उत्पादन वाढण्यास याची मोठी मदत होणार आहे. तसेच शेतक-यांचे बाजारव्यवस्थे विषयीचे ज्ञान वाढल्यामुळे शेतक-यांमध्ये बाजाराविषयी सजगता निर्माण होऊन अशा रितीने विक्री होणा-या शेळ्या मेंढ्यांना योग्य ती किंमत मिळून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणार आहे.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

## बीड व यवतमाळ जिल्हयामध्ये शेळीपालन एक उच्चमुल्य वर्धित व्यवसाय प्रात्यक्षिक गटधारकांचे प्रशिक्षण आयोजित करणे

प्रस्तावना-

जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने महाराष्ट्र कृषी स्पर्धाक्षम प्रकल्पांतर्गत पशुसंवर्धन क्षेत्रामध्ये बीड व यवतमाळ जिल्हयामध्ये शेळीपालन एक उच्चमुल्य वर्धित व्यवसाय प्रात्यक्षिक गट स्थापन करण्यात येणार आहेत. अशा गटधारकांना ३ दिवसांचे प्रशिक्षण देणे हा महत्वाचा भाग आहे. सदरील प्रशिक्षण हे तालुका पातळीवर कृषि चिकित्सालयावर आयोजीत करण्यात यावे. सदरील प्रशिक्षण हे तीन दिवसाचे राहील आणि आत्मा यंत्रणा व पशुसंवर्धन विभाग यांचेमार्फत संयुक्तरित्या देण्यात यावे.

उपघटकाचे कार्यक्षेत्र व अंमलबजावणी कालावधी

सदर उपघटकाची अंमलबजावणी विदर्भ व मराठवाडयातील जिल्हयातून करावयाची असून उपघटक अंमलबजावणीचा कालावधी सन २०११-१२ ते २०१२-१३ यवतमाळ जिल्हयासाठी व २०१२-१३ ते २०१३-१४ बीड जिल्हयासाठी राहील.

उपघटकाचे स्वरूप

जिल्हा स्तरावरील समितीने अंतिमत: निवड केलेल्या प्रात्यक्षिकधारकांचे तीन दिवसाचे प्रशिक्षण शिबीर तालुका पातळीवर पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी कृषि चिकित्सालयावर अथवा नजीकचे कृषि विज्ञान केंद्र येथे आयोजित करावे. हे प्रशिक्षण गटांना देण्यात यावे. प्रशिक्षणाची अंमलबजावणी तालुक्यातील पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती, पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दवाखना श्रेणी- १ व तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (आत्मा) यांनी संयुक्तरित्या करावी . या प्रशिक्षणात शिकविण्यात येणा-या विषयांचे व प्रशिक्षणाचे वेळापत्रक सोबत जोडले आहे. याप्रमाणे ४०% लेखी व ६०% प्रात्यक्षिके याप्रमाणे प्रशिक्षण देण्यात यावे. ज्यामध्ये पशुधन व्यवस्थापन कौशल्य सुधारणा, क्षमतावर्धन किमान तंत्रज्ञानावर आधारीत पध्दतीचा अभ्यास, पशुसंवर्धन खात्याच्या विविध योजना इत्यादींचा समावेश राहील. तसेच प्रशिक्षणार्थीचे अनुभव कथन लेखी स्वरूपात घेण्यात यावे.

अंदाजपत्रक

सदर प्रशिक्षण शिबीरासाठी प्रती प्रशिक्षणार्थी १३००/- तरतूद करण्यात आलेली असून हा निधी जिल्हा आत्मा यंत्रणेमार्फत संबधित जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचेकडे वितरीत होणार आहे. त्या प्रित्यर्थ करावयाच्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| बाब | युनिट कॉस्ट (रूपये) | एकुण खर्च (रू) |
|---|---|---|
| दैनंदिन भत्ता (जेवण, चहा, नाष्टा) | १५०/- | ४५०/- |
| प्रवास भत्ता | १५० /- | १५०/- |
| लेखन साहीत्य | १००/- | १००/- |
| माहीती पुस्तिका, छापील साहीत्य व सीडी इ | २५०/- | २५०/- |
| प्रसिध्दी / प्रचार | ५०/- | ५०/- |
| अभ्यास दौरा | २००/- | २००/- |
| प्रशासकीय खर्च (प्रमाणपत्र, ओळखपत्र *) | १००/- | १००/- |
| एकूण | | १३००/- |

* प्रमाणपत्र व ओळखपत्र जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्या स्वाक्षरीने देण्यात यावी.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

वर्षनिहाय प्रस्तावित प्रशिक्षणाच्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे राहील.

| वर्ष | तरतूद (रुपये लाखात) | प्रात्यक्षिकधारकांची संख्या. |
|---|---|---|
| सन २०११-१२ | ०३.२५ | २५० |
| सन २०१२-१३ | ०३.२५ | २५० |
| एकूण:- | ०६.५० | ५०० |

संनियंत्रण

जिल्हास्तरावर या उपघटकाचे संनियत्रण जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी करावे. या उपघटकाची अंमलबजावणी पशुधन विकास अधिकारी, विस्तार, पंचायत समिती व पशुवैद्यकीय दवाखना तसेच तालुका तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (आत्मा) यांनी संयुक्तरित्या करावी. व अंमलबजावणी अहवाल सादर करावा.

फलनिष्पत्ती

या उपघटकाच्या अंमलबजावणीमुळे जिल्ह्यामध्ये शेळी पालन एक उच्च मूल्यवर्धीत व्यवसाय ही संकल्पना रूजण्यास व दृढ होण्यास मोठा हातभार लागेल.शेतक-यांची शेळी पालना विषयीची मानसिकता वाढीस लागेल व शेतीसाठी शेळ्यामेंढ्या पासून सेंद्रीय खत मोठ्या प्रमाणात उपलब्ध होऊन जमीनीचा पोत सुधारण्याबरोबरच शेतीच्या उत्पादनावर सकारात्मक परिणाम दिसून येईल. या प्रात्यक्षिक युनिटसना शेतक-यांच्या भेटी प्रस्तावित असल्यामुळे इतर शेतक-यांमुळे या संकल्पनेचा प्रसार होऊन शेळीपालन व्यवसायाद्वारे मांस उत्पादन वाढण्यास याची मोठी मदत होणार आहे. तसेच शेतक-यांचे बाजारव्यवस्थे विषयीचे ज्ञान वाढल्यामुळे शेतक-यांमध्ये बाजाराविषयी सजगता निर्माण होऊन अशा रितीने विक्री होणा-या शेळ्या मेंढ्यांना योग्य ती किंमत मिळून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणार आहे.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

## शेळी उत्पादन तथा प्रात्यक्षिक गटांचे प्रशिक्षण कार्यक्रम पत्रिका

योजनेचे नाव - शेळी उत्पादन तथा प्रात्यक्षिक गटांची स्थापना

प्रशिक्षणाचा कालावधी - ३ दिवस

प्रशिक्षणाचे ठिकाण - नजीकचे कृषि विज्ञान केंद्र अथवा तालुका प्रशिक्षण केंद्र

प्रशिक्षणाचे आयोजक - जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त / पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती / पशुधन विकास अधिकारी तालुका पशुवैद्यकीय दवाखना श्रेणी - १/ तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (आत्मा) अधिकारी

पहीला दिवस

| वेळ | विषय |
|---|---|
| ९.०० ते ९.३० | प्रशिक्षणार्थींची नाव नोंदणी |
| ९.३० ते १०.३० | प्रशिक्षणार्थींबाबतची माहती योजनेची माहीती, शेळी उत्पादन तथा प्रात्यक्षिक गटांची स्थापना या विषयीची माहीती, शेळी उत्पादन तथा प्रात्यक्षिक गटाचे बळकटीकरण |
| १०.३० ते १०.४५ | चहापान |
| १०.४५ | लाभार्थींची निवडीचे निकष व लाभार्थ्यांचे कर्तव्य, शेळी उत्पादन तथा प्रात्यक्षिक गटाची अंमलबजावणी, शेळी उत्पादन तथा प्रात्यक्षिक गटाच्या स्थापनेतील सेवा दात्यांची भूमिका |
| ११.४५ | महाराष्ट्रातील शेळ्या मेंढ्याच्या जाती, कोकरू / करडाचे व्यवस्थापन, शेळीपालन /मेंढीपालन पध्दती बंदीस्त / अर्ध बंदीस्त पारंपारीक / मोकाट पालन पध्दत, शेळी /मेंढीचे घरे / वाडा बांधकाम पध्दती, |
| १२.४५ ते १३.३० | जेवणाची सुट्टी |
| १३.३० ते १४.३० | कातडी कमावणे अर्थात शेळी मेंढीचा कातडे व्यापार, मटणावरील विविध संस्कार प्रक्रीया पध्दत व इतर शेळी मेंढी उत्पादने |
| १४.३० ते १५.०० | चहापान |
| १५.०० ते १६.०० | शेळी / मेंढीचा आहार चौरस आहार व्यवस्थापन, हिरव्या चा-यांचे / कुरणाचे व्यवस्थापन |
| १६.०० ते १७.३० | उस्मानाबादी बंदीस्त अर्धबंदीस्त शेळीपालन माहीती पट, मटणाच्या शेळ्याचे व्यवस्थापन माहीतीपट |

दुसरा दिवस

| वेळ | विषय |
|---|---|
| ९.०० ते ९.३० | गाभण शेळ्या / मेंढ्यांचे व्यवस्थापन, बोकड/ मेंढा यांचे व्यवस्थापन |
| ९.३० ते १०.३० | शेळ्या / मेंढ्यांचे विविध आजार विषाणू जन्य / जिवाणू जन्य, शेळ्या मेंढ्याचे अंत: परोपजीमुळे होणारे विविध रोग व नियंत्रण |
| १०.३० ते १०.४५ | चहापान |
| १०.४५ ते ११.४५ | शेळी मेंढ्यातील लसीकरण व लसीकरण वेळापत्रक, शेळ्या मेंढ्यातील बाह्य परोपजीवी मुळे होणारे रोग व नियंत्रण व प्रात्यक्षिक |

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

| | |
|---|---|
| ११.४५ ते १२.४५ | शेळी - मेंढीच्या मटण उत्पादनाच्या जाती व व्यवस्थापन, मेंढीच्या लोकर उत्पादन देणा-या जाती व लोकर छाटणी पध्दती |
| १२.४५ते १३.३० | जेवणाची सुट्टी |
| १३.३० ते १४.३० | शासनाच्या शेळी मेंढी बाबतच्या योजना, शेळी मेंढी पालनाचा प्रकल्प अहवालाची माहीती व ठेवावयाच्या महत्वाच्या नोंदी, शेळी मेंढीचा विमा व त्यांचे महत्व |
| १४.३० ते १४.४५ | चहापान |
| १४.४५ ते १५.४५ | शेळ्या मेंढ्याच्या लेंढ्या व मुत्राचे जैविक विल्हेवाट व्यवस्थापन, जंतनाशके पाजणे व वेळापत्रक तयार करणे , प्रात्यक्षिक |
| १५.४५ ते १६.४५ | बाजारातील शेळी / मेंढी विकण्याच्या पध्दती अर्थात दलाल पध्दतीमुळे होणारे तोटे, शेळी मेंढी विकण्याची पध्दत वजनावर आधारीत किंमत ठरविण्याची पध्दतीची माहीती, आधुनिक बाजारहाट पध्दत व सरल भ्रमण संदेश यंत्रणा याचा वापर |
| १६.४५ ते १७.३० | शेळ्या मेंढ्याची वाहतुक पध्दत व कायदा, बँकेच्या शेळी मेंढ्या पालनाच्या विविध योजना, शेळी मेंढीची पैदास धोरण व पैदाशीच्या पध्दती, कंत्राटी पध्दतीने शेळी मेंढी पालनास वाव |

तिसरा दिवस

| वेळ | विषय |
|---|---|
| ९.०० ते ९.३० | शेळ्या मेंढ्याची संघटीत व्यापार पध्दत, स्थानिक वृक्ष, झुडूपे व गवत यांचा चारा म्हणून उपयोग, शेळ्या मेंढ्यातील प्रथमोपचार, महाराष्ट्र शेळी मेंढी पालन महामंडळाच्या विविध योजना |
| ९.३० ते १०.३० | अनुभव कथन व लेखन, शंका समाधान, प्रमाणपत्र वितरण |
| १०.०० ते १०.३० | चहापान |
| १०.३० ते १७.३० | नजीकच्या शेळी मेंढी बाजारास भेट विविध पध्दतीचा अभ्यास |